REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्यात समाविष्ट 'चर्चासत्र' प्रात्यक्षिकांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

प्राचार्या डॉ. पांढरे विद्युलता ज्ञा.
उमा शिक्षणशासत्र महाविद्यालय, पंढरपूर.

प्रस्तावना :-

बी. एड्. अभ्यासक्रमाची २०१५ मध्ये पुर्नरचना झाली. एक वर्षीय बी.एड्. अभ्यासक्रमात बदल करुन त्याचा कालावधी दोन वर्षे करण्यात आला. ह्यामध्ये अभ्यासक्रमाची नवीन कालानुरुप निर्मिती करण्यात आली. एकूण चार सत्रामध्ये विद्यापीठानुरुप विविध बदल स्विकारण्यात आले. सोलापूर विद्यापीठाने हा अभ्यासक्रम चार सत्रात करुन त्याचे गुणदान एकूण २४०० केले असून त्यामध्ये ९०० इतके गुण तात्विक भागासाठी १५०० इतके गुण प्रात्यक्षिक भागासाठी देण्यात आले. प्रात्यक्षिक भागाव्दारे शिक्षक होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकास व्हावा हा दृष्टिकोन ठेवून त्याची रचना केली आहे. त्यातील एक प्रात्यक्षिक म्हणजे 'चर्चासत्र'. 'चर्चासत्र' कसे घ्यावे या संदर्भात मार्गदर्शन आणि त्या दृष्टिने विकास होण्यासाठी सदर प्रात्यक्षिकांची रचना केलेली आहे. 'चर्चासत्र' ह्या प्रात्यक्षिकांतून विद्यार्थ्यांना चर्चासत्र संकल्पना, तसेच स्वत:चे अनुभव, निरीक्षण, भावना यांचा विकास होण्यास मदत होते. त्याचबरोबर विविध कौशल्यांची रुजवणूक होते. हा विचार करुन नेमका 'चर्चासत्र' व्दारे विद्यार्थीचा योग्य विकास साधण्यासाठी सदर संशोधन हाती घेतले आहे.

प्रात्यक्षिकांची योग्य कार्यवाही केल्यास विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिवर्तन होण्यास मदत होते. त्यासाठी प्रात्यक्षिक 'चर्चासत्र' ची योग्य प्रकार रचना, कार्यवाही आणि त्याची परिणामकारकता अभ्यासणे संशोधकास महत्त्वपूर्ण/गरजेचे वाटले त्यामुळे सदर लघु संशोधन हाती घेण्यात आले.

'चर्चासत्र' चा अर्थ :-

"शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली एखाद्या विषयाचा अभ्यास करणारा वर्ग."

चर्चासत्र आणि चर्चासत्र सादरीकरणाचे फायदे
- माहितीची साठवणूक
- शोध कौशल्यांचे विकसन
- सहकार्य भावना
- इतरांच्या भावना आणि कल्पनांचा आदर
- सहनशिलता विकसन
- विविध भूमिकांमध्ये सहभाग

संशोधनाची गरज व महत्त्व :-

१. 'चर्चासत्र' सहभाग घेवून योग्यकृती आणि त्याचे आकलन होण्याची गरज
२. आंतरक्रिया संप्रेषण प्रभावी व दृढ होण्यासाठी.
३. आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण करण्यासाठी.
४. आधुनिक अध्ययनाची शास्त्रशुध्द पध्दती विकसित करण्यासाठी.

संशोधनाची उद्दिष्टये :-

१. बी.एड्. प्रशिक्षणार्थीमध्ये 'चर्चासत्र' संबंधी सादरीकरणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
२. बी.एड् प्रशिक्षणार्थीसाठी 'चर्चासत्र' सादरीकरणासंबंधी राबविलेल्या कार्यपध्दती परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
३. बी.एड्. प्रशिक्षणार्थीसाठीचे चर्चासत्र सादरीकरण आणि राबविलेल्या कार्यपध्दतीच्या परिणामकारकततेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

शून्य परिकल्पना :-

चर्चासत्राचे प्रशिक्षणार्थी सादरीकरण आणि सादरीकरणासाठी राबविलेल्या कार्यपध्दती यामध्ये चर्चासत्र सादरीकरणाच्या परिणामकारकतेत सार्थकतापूर्ण फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती :-

बी.एड्. प्रशिक्षण घेणारे ४० प्रशिक्षणार्थीचा समावेश सदर संशोधनात करण्यात आला आहे.

संशोधनाची मर्यादा :-

१. प्रस्तुत संशोधन हे बी.एड्. प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी पुरतेच मर्यादित आहे.
२. प्रस्तुत संशोधन हे उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर मधील बी.एड्. प्रशिक्षणार्थी पुरते मर्यादित आहे.
३. प्रस्तुत संशोधन हे 'चर्चासत्र' प्रात्यक्षिकांपुरतेच मर्यादित आहे.

संशोधन पध्दती व न्यादर्श :-

संशोधन पध्दती :- प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

न्यादर्श :-

संशोधकाने चर्चासत्रासाठी बी.एड्. प्रशिक्षणर्थीचे २०-२० असे दोन विद्यार्थी गट तयार केले. हे गट तयार करताना सहेतुक पध्दतीचा वापर केला.

संशोधन कार्यपध्दती :-

२० विद्यार्थ्यांना केवळ चर्चासत्राचा विषय देवून सादरीकरण करण्यास सांगितले. तर दुसऱ्या २० विद्यार्थी प्रशिक्षणासाठी चर्चासत्राची पुर्व तयारी व आशयाचे लिखित नियोजन, चर्चासत्र सादरीकरण आवश्यक, शैक्षणिक साहित्याची हाताळणी माहिती/आशयाची योग्य निवड, प्रश्नांची उत्तरे देण्याची भूमिका इ. विषयी मार्गदर्शन केले. त्यासंबंधी चर्चासत्राचे दिग्दर्शन नमूना दाखविण्यात आला. त्यानंतर प्रशिक्षणार्थीचे सादरीकरण घेण्यात आले.

सदर दोन्ही गटांच्या सादरीकरणाचे निकष आधारित निरीक्षण सूची ३० गुणांची तयार करुन त्या आधारे निरीक्षणाव्दारे मूल्यमापन करण्यात आले.

निरीक्षण सूची

अ.क्र.	'चर्चासत्र' प्रात्यक्षिक कार्याची मूल्यमापन घटक	गुण
१.	पूर्व तयारी	०५
२.	आशयाचे लिखित नियोजन	०५
३.	प्रकटीकरण/सादरीकरण (ओघ, स्पष्टता, नियोजनबध्दता)	०५
४.	माहितीतील अचूकता व विषयातील विविध मुद्यांची सांगड	०५
५.	विषयाचे समर्थन व दुसऱ्यांच्या मतांचा स्वीकार	०५
६.	संकलित परिणाम (आत्मविश्वास, आवाजातील चढ-उतार, हावभाव इ.)	०५

वरील निरीक्षणसूची नुसार प्रत्येक विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात आले. यावरुन केवळ चर्चासत्राचे सादरीकरण करणारे प्रशिक्षणार्थीपेक्षा दुसऱ्या गटास चर्चासत्रासंदर्भात केलेल्या मार्गदर्शनामुळे 'चर्चासत्र' कौशल्य प्रभावीपणे विकसित झाल्याचे दिसून येते.

संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

दोन्ही गटांचे निरीक्षण सूचीच्या आधारे निरीक्षण करुन ३० पैकी गुणदान करण्यात आले. संकलित केलेल्या गुणदानाचे मध्यमान, प्रमाणविचलन व 't' परीक्षिका यांच्या साहाय्याने विश्लेषण करुन अर्थनिर्वचन करण्यात आले त्यानुसार परिकल्पनांचा पडताळा घेण्यात आला तसेच निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या.

प्रायोगिक गट आणि नियंत्रित गटाच्या प्राप्तांकाच्या फरकाचे मध्यमान प्रमाणविचलन आणि t परीक्षिका दर्शविणारे कोष्टक :-

गट	एकूण विद्यार्थी संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	t परीक्षिका
नियंत्रित गट	२०	१२.०२	२.१०	८.१२
प्रायोगिक गट	२०	२५.०२	३.४०	

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्राप्त t हे ०.०५ सार्थकता स्तरांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे शुन्य परिकल्पनेचा त्याग केला.

यावरुन असे दिसून येते की, चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी/सादरीकरणासाठी अचूक मार्गदर्शन मिळाल्यास परिणामकारक आणि प्रभावी सादरीकरण होते.

निष्कर्ष :-

१. 'चर्चासत्र' ह्यामध्ये सहभागी होणे हे फार अवघड आहे असे मानले जावून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. परंतू योग्य तयारी मार्गदर्शनाव्दारे केल्यास 'चर्चासत्र' प्रभावी अध्ययनासाठी उपयुक्त ठरते.
२. 'चर्चासत्रा'व्दारे विविध कौशल्यांची निर्मिती होते.
३. चर्चासत्रात विद्यार्थी सक्रिय सहभागी झाल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढतो. आंतरक्रियांची देवाणघेवाण होते.

शिफारशी :-

१. शालेय स्तरापासून चर्चासत्राचे आयोजन करावे.
२. विद्यार्थ्यांना चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी शिक्षक व पालकांनी प्रोत्साहन द्यावे.
३. चर्चासत्रांचे विषय विद्यार्थी रुचीपूर्ण असावेत.

संदर्भग्रंथ :-

१. B.Ed Curriculum and its frameworks (२०१८), Solapur University.
२. Best, Khan (२००५), Research Methodology, Delhi-Rexentice Publication.
३. जोशी देवेंद्र सदावर्ते उज्वला (२००७) शिक्षक प्रशिक्षण, नांदेड, आदित्य प्रकाशन.
४. www.google.com

LBP PUBLICATION